# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

## मा. "अ" प्रभाग समिती

## विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक १

## सभावृत्तांत

दिनांक –०९/०५/२०१९ वेळ : स.११.३० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समितीची मा.सभापती निवडीची विशेष सभा गुरुवार दिनांक ०९/०५/२०१९ रोजी स.११.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ या ठिकाणी **मा.राजेंद्र निंबाळकर** (भा.प्र.से.) पीठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, यांचे अध्यक्षते खाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.अनुराधा गणपत गोरखे
२) मा.केशव हनुमंत घोळवे
३) मा.शैलजा अविनाशमोरे
४) मा.शर्मिला राजू बाबर
५) मा.कोमल दिपक मेवानी

याशिवाय मा.आशादेवी दुरगुडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.लटपटे रामकिसन - प्रशासन अधिकारी तथा सचिव, अ प्रभाग समिती कार्यालय हे उपस्थित होते.

--------

**पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा**

सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणे बरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**प्रभाग समिती सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )**

मा. अ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) तुसार नेमणुक करणेकामी एकूण ३(तीन) नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार व त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सूचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मा. बाबर शर्मिला राजू | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे | मा. कोमल दिपक मेवानी |
| २. | मा.बाबर शर्मिला राजू | मा.शैलजा अविनाश मोरे | मा. जयश्री वसंत गावडे |
| ३. | मा.बाबर शर्मिला राजू | मा.केशव हनुमंत घोळवे | मा. तुषार रघुनाथ हिंगे |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकूण **३(तीन) नामनिर्देशन** पत्रे मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. )

( मा.पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

| | |
|---|---|
| **पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा** | मा. अ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एका उमेदवाराच्या ३ (तीन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. |

**सबब, मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.बाबर शर्मिला राजू ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील नियम ६ (१) नुसार मा.बाबर शर्मिला राजू यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.**

9.5.219

**(राजेंद्रनिंबाळकर, भा.प्र.से.)**
**पीठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा**
**"अ" प्रभाग समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**निगडी, प्राधिकरण, पुणे – ४४.**

९३

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
## मा. "अ" प्रभाग समिती
## विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक –०९/०५/२०१९ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता **मा.बाबर शर्मिला राजू** या उमेदवाराने एकूण ३ (तीन) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून सदर नामनिर्देशनपत्र वैध ठरलेली आहेत. सबब, मा. अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता **मा.बाबर शर्मिला राजू** ह्या एकच वैध उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

9.5.2019

(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
पीठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
"अ" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, प्राधिकरण, पुणे – ४४.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/९/कावि/६५/२०१९
दिनांक :०९/०५/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
अ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, प्राधिकरण, पुणे – ४४.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.